# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. २१६/२०२६

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये शैक्षणिक वर्ष २०२६–२७ करिता स्थानिक निवड समितीद्वारे नियुक्त करण्यात येणाऱ्या अध्यापकांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने दि. ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत आणि त्यासंदर्भातील आवश्यक कागदपत्रे पुढील १० दिवसांत विद्यापीठाकडे सादर करण्याबाबत परिपत्रक क्र. ९९/२०२६, दि. ०२/०६/२०२६ अन्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच परिपत्रक क्र. १८२/२०२३ अन्वये स्थानिक निवड समितीचे आयोजन ज्या दिवशी होईल त्याचा निवड समिती अहवाल ४८ तासात आणि ७२ तासात मूळ अहवालाची प्रत विद्यापीठाकडे सादर करण्याबाबत कळविलेले आहे. तसेच निवड करण्यात आलेल्या अध्यापकांची शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, अनुभव प्रमाणपत्र, पूर्वीची मान्यता पत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन पध्दतीने अपलोड करण्यात यावी व त्याची प्रिंटआऊट घेऊन सर्व कागदपत्रे मूळ निवड समिती अहवालासोबत सादर करण्याबाबतही यापूर्वीच कळविण्यात आलेले आहे.

यासंदर्भात विविध महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२६–२७ करिता तदर्थ (Adhoc) स्वरूपात नेमण्यात करण्यात येणाऱ्या अध्यापकांचे शिक्षक मान्यता प्रस्ताव सादर करण्यास मुदत वाढवून देणेबाबत विनंती केलेली आहे. या अनुषंगाने प्राप्त आदेशानुसार या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६–२७ करिता स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्त करावयाच्या अध्यापकांच्या जाहिरातीसाठी दि. १५ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच स्थानिक निवड समितीचे आयोजन करून अध्यापकांचे शिक्षक मान्यतेचे तदर्थ (Adhoc) स्वरूपात प्रस्ताव आणि **(continuation)** प्रस्ताव Online पध्दतीने भरून विद्यापीठाकडे सादर करण्यास दि. ३० ऑक्टोबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच यादरम्यानच संबंधित महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्थांनी निवड समितीचे आयोजन करून प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे अनिवार्य आहे. सदर दिनांकानंतर तदर्थ (Adhoc) स्वरूपात शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत व यापुढे कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

6/10/2026

जावक क्र. सीसीओ/५८८६
दिनांक – ०६ ऑक्टोबर, २०२६

**(स. द. डावखर)**
**उपकुलसचिव**

प्रत :– मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था